# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगरसुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्रमांक :- १३०/२०२५ दिनांक :- २०/०३/२०२५.

## अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलीचा तीन तासात शोध घेण्यात बोळींज पोलीसांना यश

दिनांक १८/०३/२०२५ रोजी सायंकाळी १८.०० वाजताच्या सुमारास विरार पश्चिम शितलनगर बिल्डींग परिसरात राहणा-या फिर्यादी वय-३५वर्षे, यांनी बोळींज पोलीस ठाण्यात येवुन माहिती दिली कि, त्यांची अल्पवयीन मुलगी वय-१४वर्षे, हि सकाळी ०७.०० वा. शाळेत गेली असता ती आदयपपर्यंत घरी आली नसुन एका मोबाईल फोन वरुन अल्पवयीन मुलीचे काकास हेल्प मी, किडनॅप असे मॅसेज येत आहेत म्हणुन फिर्यादी यांचे तक्रारीवरुन तात्काळ बोळींज पोलीस ठाणे गु.रजि.नं. ८८/२०२५ भा.न्या.सं.कलम १३७(२) प्रमाणे दिनांक १८/०३/२०२५ रोजी १९.०६ वाजता नोंद करण्यात आला आहे.

नमुद गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा व अल्पवयीन मुलीचे अपहरणाचा असल्याने मा.वरीष्ठांनी सदरचा गुन्हा तात्काळ उघडकीस आणण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन फिर्यादी व साक्षीदार यांचेकडे विचारपुस करुन अपहरीत मुलीचे काकास मॅसेज करणा-या फोन नंबरचे तांत्रिक विश्लेषण केले असता सदरची मुलगी हि मुंबईवरुन जोधपुला जाणा-या सुर्यनगरी एक्सप्रेस गाडी नं. १२४८० यामध्ये असल्याचा अंदाज आला व सदरची गाडी सुरत रेल्वे स्थानकातुन बडोदयाच्या दिशेने जात असल्याचे निष्पन्न झाल्याने तात्काळ अल्पवयीन मुलीबाबत व गुन्हयाचे गांभीर्याबाबत गुजरात राज्यातील भरुच रेल्वे स्थानक आरपीएफ, बडोदा रेल्वे स्थानक आरपीएफ व अहमदाबाद रेल्वे आरपीएफ पोलीस ठाण्यांशी व नियंत्रण कक्षांशी संपर्क साधुन माहिती देण्यात आली असता अपहरण झालेली अल्पवयीन मुलगी अहमदाबाद रेल्वे आरपीएफ यांनी दिनांक १८/०३/२०२५ रोजी २०.३० वाजताच्या सुमारास अहमदाबाद रेल्वे स्थानकात सुर्यनगरी एक्सप्रेस मध्ये सुखरुप ताब्यात घेवुन सदरचा गुन्हा पोलीस ठाण्यात माहिती मिळाल्यापासुन तीन तासाचे आत उघडकीस आणला आहे.

सदरची कामगिरी श्री.जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०३, विरार, श्री.विजय लगारे, सहाय्यक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली बोळींज पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.प्रकाश कावळे, पोलीस निरीक्षक, श्री. प्रकाश सावंत (गुन्हे), सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.वैभव जगताप, सपोनि रुपेश दळवी, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि/किरण वंजारी, स.फौ.जनार्दन मते, पोहवा/किशोर धनु, पो.अमं.संदिप शेळके, सुखराम गडाख, तांत्रिक मदत पोहवा/नामदेव ढोणे पोअं/सोहेल शेख नेम. परि ०३ विरार कार्यालय यांनी केलेली आहे.